**पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र**
**नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर**
**दिनांक २३/०१/२०२२ (रविवार)**

---

## पोस्टे सावनेर परीसरात चोरी गेलेली मोटर सायकल व मोटर पंप असा एकुण ३६,०००/— रू चा मुद्देमाल जप्त. स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

---

पोलीस स्टेशन सावनेर येथे अपराध क्र ३०/२२ कलम ३७९ भादवि अन्वयें गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयातील आरोपीतांचा गोपनिय माहीतीद्वारे पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत कवडस पाटनसावंगी येथे सापळा रचुन संशयीत इसम नामे भु—या उर्फ संतकुमार ईश्वरदयाल गजाम वय २३ वर्ष रा बंडोल मध्यप्रदेश, हल्ली मुक्काम कवडस पाटनसावंगी यास ताब्यात घेण्यात आले. विचारपुस दरम्यान त्याने ईतर ३ साथीदार च्या मदतीने सदरचा गुन्हा केल्याचे सांगुन गुन्हयात वापरलेली मोटर सायकल व विहीरीतील मोटर पंप ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद आरोपी हा सध्या पोस्टे सावनेर यांचे ताब्यात असुन पुढील तपास पोलीस स्टेशन सावनेर करीत आहे.

**जप्त मूद्देमाला वर्णन** :— गुन्हयात वापरलेली एक हीरो सुपर स्प्लेंडर कि ३०,०००/—रू विहीरीतील ३ एच पी ची मोटर कि ६,०००/— असा एकुण ३६,०००/— रू चा माल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कामगीरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा राजेंद्र रेवतकर, पोना. आशिष मुंगळे, किशोर वानखेडे यांनी पार पाडली.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)**

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा कळमेश्वर ते मोहपा रोड उबाळी शिवार ६ किमी. पश्चिम. फिर्यादी नामे — ललित श्रावणजी खेकारे वय २५ वर्ष रा. उबाळी वार्ड क्र. २, यांनी रिपोर्ट दिला कि, दिनांक २१/०१/२२ चे २१/४५ वा. दरम्यान, यातील **मृतक नामे तुषार राजेंद्र डाखरे वय २२ वर्ष रा. उबाळी** हा आपली मोटार सायकल क्र. एम एच ४० एएस ५१५८ ने उबाळी येथुन ड्युटी करीता कळमेश्वर कडे जात असता यातील आरोपीने आपले चारचाकी वाहन महेंद्र जितो गाडी क्र. एमएच ४० सीडी २८५९ भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकचा मोटर सायकला धडक मारून अपघातात गंभीर जखमी केल्याने त्यास उपचारकामी ग्रामीण रूग्नालय कळमेश्वर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी पोस्टे कळमेश्वर येथे कलम २७९,३०४ (अ) भादवी. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयातील आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास पो. हवा. सुनिल कामडी मो.नं. ९९२३१२३३९७ हे करीत आहेत.

## चोरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— अंतर्गत मौजा परसोडी शिवार ०६ कि.मी पुर्व. यातील फिर्यादी नामे— अरुण श्रावण झाडे वय ३३ वर्ष रा. वार्ड क्र ०२ परसोडी तह सावनेर जि. नागपुर याने रिपोर्ट दिला कि, यातील आरोपी नामे १) ग.भा.मिना नारायण दहेलकर २) रोशन नारायण दहेलकर ३) राकेश नारायण दहेलकर सर्व रा. परसोडी यांचे शेतीचे हिस्सेवाटनी वरुन वादविवाद सुरु असुन यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी याचे शेतामधुन अर्धा एकर शेतातील क्षेत्रातुन व फिर्यादीचे भाऊ यांचे पुर्ण एक एकर शेतामधील उभे तुरीचे पिक असा एकुण दिड एकर शेतामधुन तुरीचे उभे पिक किमती अंदाजे ५०,०००/— रू चा माल दिनांक २१/०१/२२ चे १७/३० वा. ते २२/०१/२०२२ चे ०७/३० वा. दरम्यान. कापुन चोरून बाजुला असलेल्या राजु महंत यांचे शेतात नेवुन ढिग रचला.

सदर प्रकरणी पोस्टे केळवद येथे आरोपीविरूध्द कलम ३७९, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास सफौ. रामराव पवार मो. न. ७८७५९८३३६० हे करीत आहेत.

## पळवुन नेणे

**पोलीस स्टेशन कन्हान** :— अंतर्गत खंडाळे घटाटे, पारशिवनी यातील फिर्यादी नामे — दिनेश बंसी मनगटे वय ४० वर्ष रा. खंडाळे घटाटे, पारशिवनी जि. नागपुर याने रिपोर्ट दिला कि, त्यांचा मुलगा दिनांक १८.०१.२२ चे १४.०० वा पासुन ते १६.०० वा. दरम्यान घरी कोणालाही काहीही न सांगता निघुन गेला त्याच्या जवळ असलेला मो. क्र. १) ७५१७९२८६३३ २) ९५२९५७५६५५ वर फोन करून तसेच नातेवाईकांकडे मित्रांकडे शोध घेतला असता मिळुन आला नाही. आज पावतो घरी परत आला नाही. तरी फिर्यादीचे मुलास कोणीतरी अज्ञात इसमाने पळुन नेले.

सदर प्रकरणी पोस्टे कन्हान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३६३ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, अज्ञात आरोपीचा शोध सुरू आहे. पुढील तपास पो हवा नरेश वरखडे पोलीस स्टेशन कन्हान मो.नं. ९६३७००५३०३ हे करीत आहेत.

## अपघात

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत मौजा सेलु टि पॉईट ०५ कि.मी. दक्षिण. यातील फिर्यादी नामे —शुभम योगीराज लांजेवार वय २६ वर्ष रा. राजु नगर प्रभाग नं. ०२ हींगना रोड नागपुर, हे व जखमी नामे— प्रविण टिपले २. अरविंद्र वर्मा ३. राजेश मेश्राम ४. राजेश मेहुने हे जामसावळी वरून देवदर्शन करून सावनेर गोंडखैरी मार्गाने येत असता दिनांक २२/०१/२२ चे ११/१५ वा. सुमारास यातील आरोपी अशोक आयसर ट्रक क्र. एमएच ४० ए. के. ४८०३ च्या चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन टि पॉईट असतांना कुठलेही इंडिकेटर न दाखविता कळमेश्वर रोडकडे ट्रक वळवुन कारच्या समोरच्या भागाला धडक मारली. त्यामुळे कारमध्ये बसलेल्या लोकांना जबर मार लागला व फिर्यादीला किळकोळ मार लागला.

सदर प्रकरणी पोस्टे कळमेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास सफौ/ राजेद्र पाली मो.नं. ९२८४३५४६३० हे करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**